

# माझिया माहेरा जा!
## व इतर वीणागीतें

R. S. DIXIT LIBRARY

Accession No. 747/1952-53

सरिता प्रकाशन

मूल्य आठ आणे

मु द्र क
र. रा. बखले
मुंबई वैभव
छा प खा ना
गिरगांव : मुंबई

प्र का श क
ग.का.रायकर
झावबाची वाडी
ठा कु र द्वा र
मुं ब ई नं. २

स र्वा धि का र
स रि ता
प्र का श न
किशोरी विहार
मुं ब ई नं. २८

तृ ती या वृ त्ति
गुढीपाडवा
१ ९ ५ १

वि क्रे ते
ज य हि न्द
प्र का श न
झावबाची वाडी
मुं बई नं. २

# सरित् गान !

आपली लोकप्रियता कायम ठेवतांना बीभत्स व शृंगारिक कविता न लिहिणारे, जे कांहीं बोटावर मोजण्याइतके कवि महाराष्ट्रांत आहेत त्यांत राजा बढे यांचें नांव प्रामुख्यानें घ्यावें लागेल. त्यांच्या ध्वनिमुद्रित झालेल्या वीणा-गीतांचा हा संग्रह वाचकांना सादर करतांना मला फार फार आनंद होत आहे. बोलपटांतील गाणीं, नाटकांतील गाणीं व ध्वनिमुद्रितासाठीं रचलेल्या गाण्यांत फारसें काव्य नसतें असें टीकाकार म्हणतात ! त्यांनीं हा संग्रह अवश्य वाचून पहावा. "खरें खरें काव्य म्हणतात तें हेंच" असेंच त्यांना या संग्रहाबद्दल लिहावें लागेल याबद्दल मला यत्किंचितही शंका नाहीं.

हीं गाणीं ध्वनिमुद्रित करण्यासाठीं म्हणून मुद्दाम् लिहिलेलीं नाहींत. रसिकांना तीं फार आवडलीं म्हणूनच ध्वनिमुद्रित झालीं. हा फरक लक्षांत घेतला म्हणजे या संग्रहाचें रसग्रहण चांगलें होईल. पहिली आवृत्ति अवघ्या तीन महिन्यांत संपली यावरून रसिकांची आवड स्पष्ट झाली आहे.

सुप्रसिद्ध कवि कै. जयकृष्ण केशव उपाध्ये, यांचें 'हा नाद ओळखीचा' हें ध्वनिमुद्रित वीणागीत श्री. बढे त्यांच्या अनुमतीनेंच यांत संग्रहित केलेलें आहे.

कवींनीं हा बहुमोल मेवा माझ्या स्वाधीन केला; तो मी रसिकांना अल्प मोलानें वांटीत आहे. घ्या अन् पोटभर खा !

—प्रकाशक

४८२८

# गीत संगती


(१) शबरी ५
(२) सोडी माझा पदर ६
(३) हा नाद ओळखीचा ७
(४) नका मारू खडा ८
(५) आला ग बाळराजा ९
(६) घाव घातला उरीं १०
(७) तुला लागेल छंद ११
(८) माझिया माहेरा जा १२
(९) गोजिरा ग भाऊ माझा १३
(१०) हांसे चंद्रिका १४
(११) झोपल्या राघू मैना १५
(१२) तुज काय सांगू सावळ्या १६
(१३) रे विसरलास काय १७
(१४) वाट पाही गोकुळीं १८
(१५) राउळीं झाली चोरी १९
(१६) कशी फिर्याद करूं २०
(१७) कधीं तरी कुठें तरी २१
(१८) हांसताच नार ती २२
(१९) सखि ! वसंत ये २३
(२०) उजळूं दीपमाला २४
(२१) आज भाऊबीज आली २५
(२२) पहिला शिरवा २६
(२३) पारवा पिकावर झुकला २७
(२४) शाळूवरती आलं पाखरूं २८
(२५) उगवूं मोतीचुरा २९
(२६) लाख बोल साहिले ३०
(२७) सोड मिठी जादुगारा ३१
(२८) झाली पहांट ३२
(२९) तूं कुठें अन् मी कुठें ३३
(३०) सखये प्रेमपत्र पहिलें ३४
(३१) मी तुझी शकुंतला ३५
(३२) वयाचा वसंत फुलला ग ३६
(३३) आला गडे— ३७
(३४) मी तर चाफेकळी ३८
(३५) कां दयाळा अंत माझा ३९
(३६) करवंदीमागें ४०
(३७) लाजरा बहाणा ४१
(३८) हसलें मनीं चांदणें ४२
(३९) नदीकिनारीं माझा गांव ४३
(४०) हंसवसे अशी कां मनीं ४४
(४१) फुलला ग बाई फुलोर ४५
(४२) रुतला गुलाब कांटा ४६
(४३) सखि जपून जा ग ४७
(४४) रंजवुं ये चल मंजुळ ४८

# टोचणी

रसिका ! नको धरूं संकोच !
दीडवितीच्या सरकमुईवर,
सुया सारख्या टोच
नको असूया टीकाकारा !
नको तुझी ती चोंच
चिवचिवतें, ही वीणागीतें
टोचीमधुनी खोंच
पत्रपंडिता ! निदान घ्यावी
टोचगितांची पोंच
तुझ्याच खातर गाइन रसिका
मला जिव्हाळा तोच !

दीपावलि १९४९

—राजा बढे

क 426



# शबरी

विनवित शबरी रघुराया रे
तुजसाठीं वेचिली बोरें
भागला भुकेला असशिल देवा
जमविला रानचा मेवा
दीनेची दुबळी सेवा
ही गोड मानुनी घे रे
विनवित शबरी रघुराया रे

नच उष्टावलि कुणि
मीच स्वयें तोडिली
चिमणीचे लाउनि दांत चवी घेतली
शिवली न दुजी पांखरें
मनिं शंका धरिसी का रे
तुज मधुर लागतील हीं शबरीचीं बोरें
विनवित शबरी रघुराया रे

# सोडी माझा पदर—

सोडी माझा पदर हरी रे

पागर मरली शिरीं, जाउं दे

बांधिला हिंदोल दोन्ही भुजांचा

आंदोल विंदोल करिशी साचा

झोका थांबिव रे, मोहना जाउं दे

अंग अंग बघ भिजले सारे

ओठीं विरले बोल

कुंतल काळे, नागिण लोळे

पायीं घालित घोळ

त्रिजगाला रे विकल राधिका—

फसली तुझिया नादें

पुरे पुरे ही कंदुकलीला

आतां बालमुकुंदा

हृदयीं वससी अधरी हससी—

मुकुलित नयनानंदा

वृंदवासिनी राधा रमली

मंजुळ मुरलीनादें

सोडी माझा पदर हरी—

जाउं दे

५४२६

## हा नाद ओळखीचा—

त्यांच्याच पावलांचा
हा नाद ओळखीचा ग—

कमलें सरांत फुलली
कुसुमें वनांत खुलली
करण्यास मान त्यांचा
हा नाद ओळखीचा ग—

येतां सखा हसूं का
क्षण कांहीं वा रुसूं का
रुसवा हसावयाचा
हा नाद ओळखीचा ग—

लटके रुसून कांहीं
क्षण बोलणार नाहीं
तो मान मानिनीचा
हा नाद ओळखीचा ग—

विसरून जीवभावा
देईन आत्मदेवा
तांबूल चुंबनाचा
हा नाद ओळखीचा ग—

# नका मारूं खडा

नका मारूं खडा, शिरीं भरला घडा
सल्या जाईल तडा
हें भिजेल गोरें अंग
( ऐके न बाई तरि, हसे खदखदा
असा कसा श्रीरंग )

नको धरूं हात रे पिचेल माझा चुडा
सुटेल बाई जुडा, अवखळा
भिजतील काजळकडा
( ऐके न बाई तरि, घालि हात उरी
करि डोळा वाकडा )

थंडींत भरे हुडहुडी
थरकांपे माझी कुडी
ती खरी सुखाची घडी
घे बळेच ओढुनि कवळी रेशमी शेला
जवळी न कुणी मग कोण येइ हाकेला

अधरीचा मधुरमधुर मेवा
मुरलीस वाटला हेवा
हे असे काय हो देवा
फुट्ट द्या आतां घडा, खुशाल मारा खडा
यापुढें कधि न मी करीन हो ओरडा

५४२८

# आला ग बाळराजा !

R. S. DIXIT LIBRARY NAGPUR

५२९७

—आला ग बाळराजा
माझा ब्रिजलाल

सुचे न कांहीं मला
कुठें ग ठेऊं याला
—हृदय हिंदोळ्यांत
हिंदवुं नंदलाल

माझीच मेली धीट
लागेल बाई दीठ
लावता गालीं तीट
फुगवितो गाल

माझा ग राजबिंडा
धावतां—दुडदुडा
जरीचा हले गोंडा
घुंगुर धरी ताल

लबाड हसतोऽऽग
सारखा छळितोऽऽग
म्हणे ग आई आई
मला जेऊं घाल

## घाव घातला उरीं—

घाव घातला उरीं साजणी पाहिलेस रोखुनी
कळलें साऱ्या जगास बाई कोण असे तो खुनी
घाव घातला—

भरलें कां अंगांत कापरें, गाल ओठ रंगले
चढली कमान भालीं तुझिया इंद्रधनू भंगले
घाव घातला—

दिसे उमटुनी कसलख अंगीं रम्य विजेचा बांध
कसा लपावा अंधारीं या नवपुनवेचा चांद
घाव घातला—

शोधायातें तुला चहुंकडे सुटले बाई हेर
खुणा लाजऱ्या लेउनि कैसी पडशिल बाहेर
घाव घातला—

जाऊं नको रे दूर पळोनी माझ्या हसऱ्या फुला
चल ये माझ्या मनीं लपाया कुणी न हुसकिल तुला
घाव घातला—

## तुला लागलेला छंद

के ८२७ Redolaro

कळला रे राया मला, तुला लागलेला छंद
कुणालागी आठवीता सैल झाले बाजूबंद ?
सैल झाले बाजूबंद
तुला लागलेला छंद

कुणाच्या रे यौवनाचा गालिचा हा मखमाली
मळविती सराईत नजरेच्या चोरचाली ?
नाहीं उतरली धुंद
तुला लागलेला छंद

कुणाच्या रे कुंकवाची लांब पुसटली चिरी ?
उमटलें मीलन राया तुझिया खांद्यावरी
चोरभेटिचा आनंद ?
तुला लागलेला छंद

नयनांच्या लालीतून दिसे छबी रंगलेली
कां रे उचकी लागली कुणी आठवण केली
कुणा डोळ्याचा हा फंद ?
कळला रे राया मला, तुला लागलेला छंद

# माझिया माहेरा जा !

माझिया माहेरा जा, रे पाखरा
माझिया माहेरा जा !
देते तुझ्या सोबतीला, आतुरलें माझें मन
वाट दाखवाया नीट, माझी वेडी आठवण
मायेची माउली
सांजेची साउली
माझा ग भाईराजा, माझिया माहेरा जा !

माझ्या रे भावाची उंच हवेली
वहिनी माझी नवी नवेली
भोळ्या रे सांबाची, भोळी गिरिजा
माझिया माहेरा जा !
अंगणांत पारिजात, तिथं घ्याहो घ्या विसावा
दरवळे वाई गंध, चोहींकडे गांवोगांवा
हळूच उतरा खाली—
फुलं नाजूक मोलाची
माझ्या माय माऊलीच्या
काळजाच्या कीं तोलाची
'तुझी ग साळुंकी, आहे बाई सुखी'
सांगा पाखरांनो, तिचिये कानीं
एवढा निरोप माझा
माझिया माहेरा जा !

# गोजिरा ग भाऊ माझा

कं ८२७ Replan

गोजिरा ग भाऊ माझा
किती दिसानं भेटला
कलि कळी उमलली मनीं
आनंद दाटला

खुदुंखुदुं आलं हासूं, दारिच्या ग चमेलीला
हसायाला काळवेळ, कांहीं नाहींच मेलीला

कुजबुजती कानांत, अंगणीं या जाईजुई
जिव्हाळ्याचा वाळझरा नाचे बाई थुइथुई

कुरवाळतो ग मोगरा, नाहीं मुळीं त्याला भान
मिटली ग संकोचानं लाजाळुची पानं पानं

डिवचते सदाफुली, लपलेल्या बकुळीला
डोलतो ग सोनचाफा, फुटे बोल अबोलीला

फुलामुलांच्या मेळांत, नाहीं कुठें भेदभाव
हसवावे डुलवावे सकळिका एकठाव



# हांसे चंद्रिका

हासे चंद्रिका
नीलजळीं डोले नौका

जळवंतीची तरंगलीका
प्रतिबिंबाचा खेळ रंगला
प्रेमी युगुलांचा हिंदोळा
झुलविति या झुळका

ओठांतुनि निखळलें चांदणें
ढळता अधरदलें
प्रीती मानस सरांत फुलली
दोन निळी कमलें
भुलवी नाविका

९४२८



# झोपल्या राघूमैना

झोपल्या राघू मैना
गळयांत घालुनि मिठी
झांकुनी लाजलाजऱ्या नैना

दो दिवसांचे गोड चांदणें
जाइल जळुनी अभिमानें
उरविल अपणा [छळावयाला
लांब काळजी रैना

नकळत झुलता प्रीततरंगें
मनीं रेखिली मधु प्रतिबिंबें
नयनांतुनि निखळता साजणी
जाईल फुटुनी ऐना

✤

# तुज काय सांगुं सावळ्या

तुज काय सांगुं सावळ्या कहाणी अुनी
कशि गळ्या कळेना दासीची विनवणी

अशि पाहुं नको रे जीवकुडीची तुटी
तें रूप मनोहर कधि या पाहिन दिठीं
ही युगायुगांची अशीच राहो मिठी
तूं मला साजण्या तुलाच मी साजणी

मज वेडी म्हणतील जनीं
मी हसेन मनिच्या मनीं
साठवितां तुज लोचनीं

ओळखिलें सखया,
पाहिलें न लाजुनी
उठलें तरि देवा
मी संसारांतुनी

## रे विसरलास काय

रे विसरलास काय, आज प्राणजीवना
नच पुसल्या अजुन भावप्रीतिच्या खुणा

कधि येशि राजसा
जीव हा पिसा
बघ अश्रुमणी ओघळून जळत भावना

तुजसाठीं झुरतें रे !
मी मरणीं मरतें रे !
तळमळते ही मीना जीवनाविना

येइ रे विहंगमा
प्रीत पांखरा !
कशि धीर धरूं आठवांत आवरूं मना !

# वाट पाही गोकुळीं

वाट पाही गोकुळीं मोहना, तुझी रे चंद्रावळी
फिरे पांखरापरी माधवा, राधागौळण खुळी

हंबरती गोपाळा धेनू तुझ्या कदंबातळीं
बिंब तरंगे शामसुंदरा, अजुनी यमुनाजळीं

विसरलास का गोकुळा ?
तो वेणूरव मंजुळा
जीवास लागला ळळा

लीला तव पाहता वाहिल्या आनंदाच्या सरी
सुनी तुझ्याविण बालमुकुंदा, नन्दाची ओसरी

किती काहूं रे आठवणी
गेले दिन हरिणावाणी

शामा ही तव मेघश्यामा आळविते बावळी
भेटेल का कधिं कृष्ण सांवळा गोकुळिचा गवळी

# राउळीं झाली चोरी

क्र ४२८

राउळीं झाली चोरी चोरोनी कुणी नेला
कुठें रे भुललासी रेशमी तुझा शेला ?

नोहे रे कृष्णामाई नोहे रे भीमगंगा ?
धांवण्या धावलासी कुणाच्या पांडुरंगा

भाळून भक्तालागी गेलासी लगबगा
झांकाया हालचाल अंधार मनाजोगा

लोळण घेई पायीं आतुर चंद्रभागा
भिजला पितांबर भिजला तुझा सोगा

उराशीं कवळून हृदयीं लपविला
चोरोनी कुणी नेला, रेशमी तुझा शेला.

तुझिया संगतीनं
देवा रे आळ आला
मायेनें कुणावरी तुवांच पांघरीला.

कोण ती अशी चोर
कळलें विठू मला
जनीच्या उशीखालीं सांपडे तुझा शेला

# तुजवर कशी फिर्याद करूं ?

तुजवरी कशी फिर्याद करूं
हा कशास भलता वाद धरूं ?

असेल साधीभोळी लतिका
कुणाभोवतीं घालुनि विळखा
उन्मळता माझा कल्पतरू !

भोगायाचें क्षणिक सुखाला
भाळुन खोट्या अभिमानाला
मीपणांत कां सर्वस्व हरूं !

अढळ प्रीतिच्या मंगल धामीं
अनंतांतल्या त्या आरामीं
ये मिळुन कोवळे रंग भरूं

दूर दूर राहिलों जीवनीं
जातांना परतून ठिकाणीं
भेटतील शेवटी वाटसरू

# कधींतरी कुठेंतरी

कधींतरी, कुठेंतरी, फिरून भेटशील का
अनोळखी मुशाफरा हसून बोलशील का ?

पाहिलें पुन्हां पुन्हां
झांकला तुझा गुन्हा
लाजेची नजरझुंज लपुन खेळशील का
लपून खेळशील का, फिरून भेटशील का ?

जीभ कां जडावली
जाशि परत पावली
जातांना एकदां वळून पाहशील का
वळून पाहशील का, फिरून भेटशील का ?

या मनांतली छबी
ही इथेंच कीं उभी
ओढ लागली तुझी—कळून हांसशील का
कळून हांसशील का-हसून बोलशील का
कधींतरी, कुठेंतरी, फिरून भेटशील का ?

# हासतांच नार ती

हासतांच नार ती अनार मस्कती उले
पारिजात लाजती मनांत जाइची फुलें

ऐकुं येइ गीतिका सुरासुरांत ओविली
तार कंपिता हृदीं नि झार पैंजणांतली

कोवळ्या फुलांवरून टाकि मंद पाउलें
नाचती उरावरी तरी चकोरमंडळें

सोडिलेस भोंवताल धीट नैनपारवे
तुझ्या अजाण प्रीतिचे कुरंग खेळती सवें

रान मोकळें तुला, दबा धरून घ्या उडी
वेढण्यास सावजास कोवळे सवंगडी

येत कोण ते पहा, हळूच चोरपावलीं
जपून हालचालही हले तशीच सावलीं

तीर हातुनी सुटे, अधीर झेप टाकली
कळे न सावजास ही कुणी शिकार साधली

R. S. DIXIT
LIBRARY

# सखि वसंत ये

सखि ! वसंत ये, वसंत ये, वसंत ये,
शरसावर हा, मदमा रे

फुलवाया, ललितलता या,
सुखशीतल वाहत वारे

यमुना पुलिनी, प्रतिबिंबाची कालिंदी करि चोरी
डोलविती हा जलहिंदोला हांसे चंद्रचकोरी
गोरी राधा गौळण आली
भेटायास मुरारे—

कळली रे गुपितें, लालस लोचन नटले
हसशी कलहंसा पंख जरी ते मिटले
मधुयौवन रंग खुलवि—
अंग अंग अंग सखी
झुलत प्रणय भारें

रास खेळतो गोपखिलारी—
घेऊन अधरीं मुरलीला
नयनांच्या मृदुशयनावरती
नीज राजसा घननीला
राधा माधव वसंतरंगीं
रमलें गोकुळ सारें




उजळू दीपमाला
सखे ग, घालू प्रीतमाला

उज्ज्वलित हा, अवनी पहा
दिवाळीचा सण आला

एक एक चांदणी
येत ही नभांगणीं
गगनिं दिवे, भुवनीं दिवे
नटली चंद्रशाला !

उधळित मधुसुमगंधा
येइ सख्या आनंदा
भेटवी रे भेटवी त्या
नंदनंदनाला !


सौ. मोहनतारा अजिंक्य

R. S. DIXIT LIBRARY, NAGPUR.
Purchased ... 7-11-52
Cl. ... क 826
Accession no 247/19525



# आज भाऊबीज आली!

आज भाऊबीज आली
पहा सांजेची नव्हाळी
उभी तारका आभाळी
भाऊरायाला ओवाळी

ध्या हो करीं नीरांजनें
प्रीती भरली लोचनें
दूर गुंतलेलीं मनें
माहेराच्या मोहजाळी

दिपवीत तिन्ही लोकां
आला ऐकूनिया हाका
भाऊ माझा पाठीराखा
करूं साजरी दिवाळी

# मृगाचा हा पहिला शिरवा

मृगाचा हा पहिला शिरवा
घालील तुला ग शालू हिरवा हिरवा

वे इंद्रगोप इवले
पदराला मोती चुले
दवबिंदूची नाजुक जाळी
लेउनिया मिरवा

जलभुईवरी जलधारा
वसुमती तुझ्या अभिसारा
ओठावरती मृदु हास्याच्या
जाइजुई फुलवा

हें पिकेल सोनें जई
नटशील कशी ग सई
कणसावर येतिल तुरे
लवथवे बाग तुझा हिरवा

मृगाचा हा पहिला शिरवा—

# पारवा पिकावरी झुकला

चुकली ग गोफणफेक
लाजरा नेम आज हुकला
रानराघुचा कळप बाई ग पिकावरी झुकला
पारवा पिकावरी झुकला

ही लवली काया घेतां गोफणगिरकी
मिसळली तयातच उरांतली थरथर कीं
अन् नेम लागला तेढा
आला गळ्यांत गोफणवेढा
पाहून हांसला गहूं, हरबरा पिकला
पारवा पिकावरी झुकला

नवतिचा पाहुनी मळा
काळीची कोवळी कळा
ये राजरोस वावरीं—
पाहुणा पायवाट चुकला
पारवा पिकावरी झुकला

# शाळूवरती आलं पाखरूं

शाळूवरती आलं पाखरूं
नका हाणुं गोफणी, घरधनी !
होइल ना घायाळ मंजुळा—
मुसमुसली ज्वानी !

अजून हिरवा कंच हरबरा, ऊस लागला लवूं
कणसावरती तुरा डोलतो, भरास आला गहूं
मिश्रूड गव्हाला फुटे,
कोवळे काटे
या उरीं सुयांची गोड गोड बोचणी
घरधनी !
होईल ना घायाळ मंजुळा
मुसमुसली ज्वानी !

चला उसाच्या मळयांत राया—
गळयांत घालू गळे
डोळे भरुनी ऊस पाहतो
इतर न कोणा कळे
ओठांतच जिरवूं रंगदार लावणी—
घरधनी !
होईल ना घायाळ मंजुळा
मुसमुसली ज्वानी !
शाळूवरती आलं पांखरूं

# उगवूं मोतीचुरा

ये पिकवूं अपुलं शेत मंजुळे उगवूं मोतीचुरा
तुझ्या नि माझ्या रानप्रीतिचा झुळझुळ वाहे झरा

गुणगुणत करूं लावणी
घरधनीण अन् घरधनी
हळदीचे फिरती हात नांदती लक्षुमि माझे घरा
मंजुळे उगवूं मोतीचुरा

हे ओलवतीचं पाणी
करि बोलवती ही राणी
वर अंबर भरलं, सरसर झरलं, भिजली सारी धरा
मंजुळे उगवूं मोतीचुरा

बघ भरारला जोंधळा
हालते पात सळसळा
ते हिरवे लोलक डुलति मजेनं भरला ग हरभरा
मंजुळे उगवूं मोतीचुरा

मोत्यांची आंतरमाया
संभाळ कोंवळी काया
येईल कळप राघुचा मारिते साळुंकी लहरा
आली ग ज्वानी तुझी बहरा
मंजुळे उगवूं मोतीचुरा

तुझ्या नि माझ्या रानप्रीतीचा झुळझुळ वाहे झरा

# लाख बोल साहिले

तुजसाठीं राया रे लाख बोल साहिले !
पाहुनिया मोहिलेस
मोहुनिया पाहिलेस
पाहिले नि लाजले नि लाजुनीहि पाहिले
फिरुनि फिरुनि पाहण्यास नयन पिसे जाहले

चैत्रि कोवळ्या उन्हांत
शरदाच्या चांदण्यांत
तुजसंगें अंग अंग प्रीतरंगीं नाहले; अंग अंग नाहले
घेतलेस जीवदान मूक आसवांतलें

सुटलें माहेर मला
तुटलें रे उभय कुलां
मोजतां न येति उरी जहरी बाण लागले
फुटले रे हे जिव्हार तरिहि प्रेम लाभलें

चहुकडुनी तुटति विजा
विरह मेघदूत तुझा
लागलि बरसात त्यात नांव गांव वाहिले
माझे मजजवळि सख्या कांहिही न राहिले

# सोड मिठी जादुगारा

सोड मिठी जादुगारा
मोहमयी रात सरे
जागवितां आठव तो
गोड वेदनेंत उरे

कां नीज भरे–केविं कुणि नयनीं दिसावा
भुजबंधीं हा मिलिंद घेई विसावा
लाजुनिया रजनी पळे
लोटुनिया चंद्रकरां
दीपकळी मालविता
हासते वसुंधरा

बघ ओघळलें गालिं सख्या काजळ काळें
करकंकण हे मूक तरी पायल बोले
मधुर स्वप्न हें विरलें
ऊठ ऊठ राजिवा
शकुंत गाती गीत, ये दिवस हा नवा
दंवबिंदुतुनी इंद्रधनू देई पहारा,
उघडी कलिके दार रवि येत विहारा

# झाली पहांट

झाली पहांट
फिरे काळोखाचा वेढा, चांद वळला वांकडा
पहा उजळल्या कडा, डुले दारीचा केवडा
मवती जंगल दाट

साद घालितो कोंबडा, उठा नयन उघडा
वाजे राउळीं चौघडा, पडे प्राजक्ताचा सडा
खचली पाऊलवाट

घरघर घरोघरीं, सूर मंजुळ लहरी
तरंगत वाऱ्यावरी जाती पहिल्या प्रहरी
गाती सृष्टीचे भाट

जातां गुंजती गौळणी मंद पैंजणपाउलीं
कटिकुंभ आंदोलती गानीं गुंग भृंगावली
बोले पाणियाचा घाट

झोपडींत मायलेकीं, दळताती सासूसुना
तुझे पाऊल पडूं दे अंगणांत नारायणा
उजळित पुढली वाट

क ४२८

## तूं कुठें अन् मी कुठें—

हांसल्या ओठावरी त्या लाजल्या जाईजुई
तें हंसें दूरावलें ग तूं कुठें अन् मी कुठें
नांदतो मी भूतलीं तूं देवता स्वर्गातली
अंतरानें बांधलो गे
—तूं कुठें अन् मी कुठें

लोकदृष्टीला दिसेना प्रीतिचा आलोक तो
हांसवी या वेडप्याला
—तूं कुठें अन् मी कुठें

घातल्या आणा गळ्याच्या, घालतांना ती मिठी
कीं कधीं सोडूं न कोणा
—तूं कुठें अन् मी कुठें

जागवील्या रम्य रात्री पारिजाताच्या तळीं
सांगता गोष्टी मजेच्या
—तूं कुठें अन् मी कुठें




प्रेमपत्र पहिलें सखये
मखमाली गालावर लाजत
अधरांनीं लिहिलें
सखये प्रेमपत्र पहिलें

अंगांगावरी रंग पसरला
मणिबंधीं फिरफिरुनी पुसला
उपाय माझा पुरता फसला
यौवन रसरसलें

वाचायातें नयनें मिटलीं
तरीही लाजरी हौस न फिटली
जाति न लिखितें पुसतां पुसलीं
अंतरंग कळलें
सखये प्रेमपत्र पहिलें



# मी तुझी शकुंतला

आले नगरीं तुझ्या नृपाला
प्रीतफुलांची लेवुनि माला
आलें नगरीं

ओळखिलें काय मला जीव जिथें गुंतला
वनांतली, मनांतली मी तुझी शकुंतला
आठव ती शुभमंगल वेळा

पुसत तुझें नांव, गांव, येत खुळी बालिका
हरवली सख्या कुठें तूं दिलीस मुद्रिका
घ्या हो पदरीं मला कृपाला

# वयाचा वसंत फुलला ग

वयाचा वसंत फुलला ग
तुझा हा मन्मथ भुलला ग

मोहरली तनु थरथरे
फडफडती नयन पांखरें
ती किणती कंकणें करीं
वयाचा चंद्रहि कलला ग

तूं निघालीस एकटी
शोधाया यमुनातटीं
तो वाळवंटिं राधिके एकला
मनांत हंसला ग

# आला गडे तुझा ब्रिजलाल !

क्र 826. Replace

आला गडे तुझा ब्रिजलाल !
शोधुनि शिणली, नजर लाजरी
सुनाच रंगमहाल

काळवेळची शकुनवंति ही
चुकचुकली ग पाल

लबाड मधुपा, कलिकेचे या
कुस्करिसी कां गाल ?

कसे बाई ग, झुळता नजरा
हासत विणलें जाळ

# मी तर चापेकळी

करिसी गुंजारव कां भ्रमरा ?
मी तर चापेकळी
ही कमळण नोहे रे खुळी

कळली रे रसिका प्रीत तुझी चंचल
भलताच खेळ हा नको, सोडी अंचल
सौभाग्य दान दे करुनी शुभमंगल

ही प्रीतनिर्मला, जरि जन्मले
क लं कि ते च्या कुळीं
भ्रमरा मी तर चापेकळी

❦

# कां दयाळा अंत माझा पाहसी ?

कां दयाळा अंत माझा पाहसी
ये उडोनी राजहंसा मानसीं

दूर देशीं गुंतला माझा धनी
शोधिते ग त्या विहंगाला वनीं

आडवे हे हात सारोनि दुरी
मेघमाले, येऊं दे त्याला घरीं

या वियोगें ही झुरे संयोगिता
कैंवि यावा-योग, राया भेटसी

घे मला पंखांत, माझ्या पांखरा
प्रीतिची ती ऊब सेवूं दे कुशीं

# करवंदीमागें

करवंदीमागें उभी लाजरी पोर
कीं घनाआड ती लपे बिजेची कोर

चाहुली करुनि अभिसार कुणा भेटाया
डोकाउनि बघती तुला तरूंच्या छाया
हुडकशी रातदिन अशी प्रीत आनंद
कुंजांत कोठल्या लपला गे गोविंद
—जिवाचा चोर

हा भवखुळ वारा जन्माचा छळवादी
प्रणयाचे भरतो सूर भावसंवादी
चाहूल तुझी ऐकिली लतावेलींनी
कुजबुजती कलिका परस्परांच्या कानीं
—लाजरी पोर

थरकांप जिवाचा असा नाच नयनांचा
पावलोंपावलीं गडे फुलांच्या ठेंचा
बसवेल कुठवरी ठगे पायिं नुपुरांना
हलुहलु गुंजलि मधुबोलांची वीणा
—लाजरी पोर

कां ठगाच चाला गडे असा पदराशीं
लाजेचा चाले विलास मृदु गालांशी
कुरवाळुनि तुजला देत धीर जलवंती
शिकविते बोल प्रीतिचे रंगरसवंती
—लाजरी पोर

## लाजरा बहाणा

कुणा कुणा ग कुणा कुणा,
सांगशि हा लाजरा बहाणा ?
भेटायातें असा तुला ग कुठला बाई वेळ !
सुरू जाहला संसाराचा पहिला वहिला खेळ !
अर्ध्या मिटल्या पापंणिच्या या
कळल्या बरं कां खुणा खुणा
नाहिच का ग बोलायाचें ?
काम दुजेच असतां ओठांचें
नको तरी वाटतें हवेसें
पुन्हां पुन्हां कां पुन्हां पुन्हां !
मुलुखाची ही लाज धिटुकली
चहाड मेली, सांगत सुटली
संकोचाला वाचा फुटली
कसा लपावा गुन्हा गुन्हा ?
चांदण्यांत जी फुलुनी हसली
नाजुक नार कशी ग रुसली
चांदण्यांतली वेल करपली
नको छळूं रे उन्हा उन्हा !
किती युगांचा दिन ना जाई
सरत रात ती पळांत बाई
राजाविण वाटतो कसा ग
महाल तुजला सुना सुना !

## ८. हंसलें मनिं चांदणें

हसलें मनिं चांदणें
जपुनी टाक पाउलं साजणी वाजतील पैंजणें

बोचतील ग फुलें जाइची तुझी कोमल काय
चांदण्यांतही सौंदर्या रे पोळतील ना पाय !

पानांच्या जाळींत लपोनी, चंद्र पाहतो गडे
सांग कुणाच्या भेटीसाठीं जीव सारखा उडे !

कुजबुजुनी कानांत सांगतो मधुप, नको ग रुसूं
लाजलाजऱ्या कळ्या फुलांना खुद्कन् आलें हसूं

भिरभिरतांना नयन पांखरे, ये पंखाचा वारा
सुटू आवातें पहा छेडिल्या हृद्‌विणेच्या तारा

हो जरा, बघा कीं वरी, कळूं द्या तरी
उमटुं द्या वाणी
कां आडेवेडे उगाच सांगा काय लाभलें राणी ?

कां ग असा पाठीस लागता मिळुनि साऱ्या जणी !
आज लाभला मला माझिया सर्वस्वाचा धनी

किती, किती ग भाग्याची
भलतीच ओढ ही कामसुंदराची
नव्हे ग शामसुंदराची
हसलें मनिं चांदणें




नदीकिनारीं माझा गांव—
ऊन पाऊस शिवेना
मोहाची छाया दाट
आंब्याच्या राईतून—
गेली माझ्या
माहेराची वाट!
तिथल्या प्रेमळ
आठवणींचा
उरीं कोवळा घाव!

किती काढसी श्रावणमेघा
विरतिल पाण्यावरती रेघा
झरझर सरत्या
वाळूवरती
अजुनि उमटलें नांव

नकळे बाई कुणी वसविला
चराचरांच्या मनीं ठसविला
पैलतिरीं
न्यायास एकली
प्रभु नांवाची नांव

## हंसतेस अशी कां मनीं ?

हंसतेस अशी कां मनीं
कोण ग उभे तुझ्या अंगणीं !

कितिकदां वळुन् पाहसी
अन् पुन्हां नजर वळविसी
हा लपंडाव खेळसी
कोण ग उभे तुझ्या अंगणीं !

अडविसी मुखावर हसे
थरकांप हृदयिं होतसे
लागलें कुणाचें पिसे
कोण ग उभे तुझ्या अंगणीं !

वळवे न जीभ का मुकी ?
रक्तिमा पसरते मुखीं
रेखिलें चित्र हें कुणी
कोण ग उभे तुझ्या अंगणीं ?

कोण ग ! तेच का गडे ?
पण् कशास हो एवढे
अगबाई, मुळीं न आवडे
नव्हे का नांवहि तें भाषणीं !
कोण ग उभे तुझ्या अंगणीं ?

क 826
Replaced

# फुलला ग बाई फुलोर

फुलला ग बाई फुलोर
वरि चंद्राची हसरी कोर
तुझ्या नौकेत लहरी पोर
पापणिचा थरकांप सारखा
हृदयीं प्रणय हिलोर

चंद्रमुखीची नवी नव्हाळी
केळपान कीं पाठ कोवळी
पिठनि चांदणं लोळत
पडली नागिण काळीभोर

आली धांवत भरतीची लाट
खुल्या पदराचा भिजला काठ
परस्परांच्या मनांत लपती
चांदण्यांतले चोर
फुलला ग बाई फुलोर



# रुतला गुलाब कांटा

रुतला गुलाब कांटा
नकळे कुठें कधीं हा
अडवीत वाट माझी
हा ताटवा फुलांचा
या पुष्पवाटिकेच्या
माहीत चोरवाटा
ही वेदना सुखाची
दुसऱ्याही अंतराला
अन् ओठपाकळ्यांचा
होणार काय तोटा !
ये छेडतां मजेनें
मखमालि गालिं लाली
रे लाडक्या गुलाबा !
उलटेल डाव खोटा

# सखि, जपून जा

Replace

सखि जपून जा ग,

जपून जा ग, जपून जा
कुणि येइ तुला हुडकाया
जलधारा, अविचल वारा, भिजवाया कोमल काया
भरली यमुना, तीर दिसेना, वाहे पूर तमाचा
भावतरंगें, भिजलीं अंगें, धांवे धीर मनाचा
आली बाला, भिजलाला रे, तुझिया मनीं लपाया

रशनेचे मणि किणती कंप भरे कटिबंधा
करि कंकणरव मधुरा, मंद घात मणिबंधा
सखि सांगति पदनुपुर बोल बोल गुंजुनिया
जाय नटुनि जाया

पील डकलले पडता गांठी, भरले भिजल्या पदराचें
एकांतीं आलिंगन भेटी, मीलन मिटल्या अधरांचें
वीज चमकली पहा पहा ती, दिसती हलत्या छाया

# वीणे !

रंजवूं ये चल, मंजुळ वीणे ! व्याकुळ आपुली राणी
आळविसी कां कंपितहृदयें निराश रामकहाणी

तुझा नि माझा गडे जिव्हाळा
गाऊं ये, गळ्यांत घालुनी गळा
साज न बोले, ना साजन बोले, मनाची नीरव गाणीं
वीणे ! व्याकुळ आपुली राणी

ओसरला ग प्रीतीचा पूर
आसवांत या विरले सूर
ठयींत सारखा उडतो कर, घायाळ पाखरावाणी
वीणे ! व्याकुळ आपुली राणी

जिवाजिवांची सरेल साथ
चंद्राविण भासे काजळी रात
एकली अनाथा असोनि नाथ
होतांच प्रभात, विझेल दीपिका, हासत उदासवाणी

भाळींचें लिखित कसें ग पुसेल,
आणिता डोळिया पाणी !
वीणे ! व्याकुळ अपुली राणी

❖

---

□ □ गायिका : सरस्वती माने □ □

---